# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:04.07.2025** **वार:शुक्रवार**

---

1. राज्यात विवाहपूर्व थॅलेसिमिया रोगाची चाचणी बंधनकारक करणार असल्याची आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची विधानसभेत माहिती
2. बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांमध्ये प्रवेश आणि शिष्यवृत्तीसाठी समान धोरण राबवण्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं आश्वासन
3. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज पुणे दौऱ्यावर आणि
4. अँडरसन-तेंडुलकर चषक स्पर्धेच्या दुसऱ्या क्रिकेट कसोटीत कर्णधार शुभमन गिल याचं ऐतिहासिक द्विशतक; पहिल्या डावात भारत भक्कम स्थितीत

**विधिमंडळ-मुंबई**

राज्यात विवाहपूर्व थॅलेसिमिया रोगाची चाचणी बंधनकारक करणार असल्याची ग्वाही सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी काल विधानसभेत दिली. याबाबतचा प्रश्न विकास ठाकरे यांनी विचारला होता. प्रत्येक जिल्ह्यात या रोगावरची उपचार केंद्र सुरू केली जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

राज्यात सिटी स्कॅन आणि एम आर आय यंत्रांचा तुटवडा अथवा बंद असलेल्या सर्व ठिकाणी या सुविधा दोन महिन्यात कार्यान्वित करण्याचं आश्वासन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिलं. यासाठी चांगल्या कंपन्यांची यंत्रं खरेदी करण्याकरता आधीच दर निश्चिती करून परवानगी दिली जाईल असं उपमुख्यमंत्री अजित पवार सांगितलं.

वाळू आणि रेती वाहतुकीसाठी चोवीस तास परवानगी देण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी जीपीएस प्रणाली आणि सीसीटीव्ही कॅमेरा पद्धती लागू केली जाणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली. यानुसार आता संध्याकाळी सहा नंतर महाखनिज या पोर्टलवरून वाहतूक परवाना दिला जाईल असं त्यांनी सांगितलं.

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण विधेयक 2025 काल विधान परिषदेत एकमतानं मंजूर करण्यात आलं. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग विधेयक आणि महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग विधेयकालाही काल विधान परिषदेत एकमतानं मंजुरी देण्यात आली.

राज्यात अमली पदार्थांच्या विरोधात कडक धोरण राबवलं जात असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधान परिषदेत सांगितलं. शैक्षणिक संस्थांच्या परिसरात अंमली पदार्थांची विक्री थांबवण्यासाठी सरकारनं मोठी कारवाई सुरू केली आहे. याबाबत सरकारनं मोठ्या प्रमाणात जनजागृती मोहीम हाती घेतली असल्याचं सांगून मुख्यमंत्री म्हणाले.....

***या व्यसनाधीनतेमध्ये ग्रामीण भागातली जी व्यसनाधीनता आहे ती मूलतः कोडीनच आहे. म्हणजे हे जे काही कॉग सिरप वगैरे जे आहेत हे मोठ्या प्रमाणात त्याचं सेवन करणं. आता त्या संदर्भात आपण कारवाई केलेली आहे. आणि फार्मसी असोसिएशन ने त्याला मान्यता दिली. आणि हे ठरलं की प्रिस्क्रिप्शन शिवाय कोडीन द्यायचं नाही. आणि सगळ्या फार्मसियांना आपण सांगितलं की त्यांनी सीसीटीव्ही लावणं गरजेचं आहे. त्यामुळे आता सगळ्यांनी जवळपास ऐंशी टक्के ठिकाणी सीसीटीव्ही लागलेत. वीस टक्के ठिकाणी लागतायत.***

बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांमध्ये यापुढे विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारावर विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यात येणार आहे. या संस्थांमधली विद्यार्थ्यांची संख्या, सर्वसाधारण शिष्यवृत्ती, परदेशी शिष्यवृत्ती, प्रवेश प्रक्रियेबाबत समान धोरण राबविण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. ते म्हणाले....

*ज्या कोर्स केल्यामुळे मुलांना मुलींना स्वतःच्या पायावर एक तर उभं राहता येईल, स्टार्टअप्स मध्ये त्याला काहीतरी स्वतःचा उद्योग सुरु करता येईल किंवा त्यांना नोकरी मिळेल. अशा प्रकारच्या कोर्स ला सभापती महोदय मी जरी सारथीच्या बद्दल उत्तर देत असलो तर साधारण राज्य सरकारचं सारथी, बार्टी, महाज्योती या सगळ्याच्या बाबतीमध्ये तीच भूमिका आहे. कुठल्याही विद्यार्थी विद्यार्थिनींच्यावर अन्याय होणार नाही. ही पण काळजी आम्ही घेतोय. परदेशात पण मुलांना मुलींना पाठवत असताना कुठल्या कुठल्या कोर्स करता पाठवायचं, त्याची पण संख्या आम्ही ठरवलेली आहे. अशा प्रकारचं साधारण धोरण राज्य सरकारने स्वीकारलेलं आहे.*

**<u>अमित शहा-पुणे दौरा</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज पुणे दौऱ्यावर असून काल रात्री त्यांचं पुण्यात आगमन झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. अमित शहा यांच्या उपस्थितीत आज विविध कार्यक्रम होणार आहेत. ऐकुया त्याबाबतचा वृत्तांत....

*खडकवासला इथल्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या परिसरातील त्रिशक्ती प्रवेशद्वारावर थोरले बाजीराव पेशवे यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचं साम्राज्यात रुपांतर करणारे अजेय योद्धा थोरले बाजीराव पेशवे यांच्या या भव्य अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर शहा राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतील छात्र आणि सैन्य अधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. पुण्यातील कोंढवा परिसरातील जयराज क्रीडा संकुलाचं उद्घाटन; तसंच बाळासाहेब देवरस रुग्णालयाची पाहणी देखील अमित शहा करणार आहेत. त्यानंतर वडाची वाडी रस्त्यावर उभारण्यात येणाऱ्या पीएचआरसी हेल्थ सीटीचं भूमिपूजनही अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी लौकिका रास्ते पुणे.*

**<u>रिपोर्टर</u>**

आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागामध्ये कॅज्युअल रिपोर्टर या अस्थायी पदासाठी सूचि तयार करण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख 20 जुलै आहे. सविस्तर माहिती आणि अर्ज करण्यासाठी newsonair.com या वेबसाईटवर vacancies या टॅबला भेट द्यावी. वृत्त विभागाच्या 020-255 10 506 या क्रमांकावर देखील संपर्क साधता येईल.

**<u>पालखी-सोलापूर</u>**

आषाढी एकादशी आता दोन दिवसांवर येऊन ठेपली आहे. विठुरायाच्या ओढीनं पंढरीकडे निघालेल्या संतांच्या पालख्या आता पंढरपूरपासून अवघ्या काही अंतरावर येऊन पोहोचल्या आहेत. ऐकुया याबाबतचा वृत्तांत.....

*हरिनामाचा जयघोष करत संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचं काल पंढपूर तालुक्यात आगमन झालं. त्यापूर्वी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचं ठाकूर बुवा समाधी इथं नेत्रदीपक गोल रिंगण झालं. माळशिरस तालुक्याच्या हद्दीत संत सोपान महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालख्यांची बंधुभेट झाली. या सोहळ्यानंतर माऊलींची पालखी भंडीशेगाव इथं मुक्कमी  पोहचली. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांची पालखी काल पिराची कुरोली इथं मुक्कमी पोहोचली आहे. आज दोन्ही पलाख्या वाखरीच्या पालखी तळावर मुक्कामी पोहोचणार आहेत. दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पंढरपूरला भेट देऊन, जिल्हा प्रशासनानं भाविकांना उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधांची पाहणी केली. आकाशवाणी बातम्यांसाठी सोलापूरहूं महेश पांढरे यांच्यासह मंजुषा गायधनी,पुणे*

**<u>संप-नवी मुंबई</u>**

वाहतूक पोलिसांकडून होत असलेली अन्यायकारक दंड वसुली आणि ई चलनावर लावलेला दंड माफ करण्याच्या मागणीसह इतर मागण्यांसाठी नवी मुंबईतल्या वाहतूकदारांनी 1 जुलैपासून बेमुदत संप पुकारला आहे. आपल्या मागण्या मान्य झाल्याशिवाय संप

मागे घेणार नसल्याचा निर्धार काल त्यांनी नवी मुंबईत पत्रकार परिषदेत व्यक्त केला. आजपासून हा संप अधिक तीव्र करण्यात येणार असून अत्यावश्यक सेवांची वाहतूकही थांबवण्यात येणार असल्याचं संघटनेनं काल सांगितलं.

**एनडीआरएफ**

पावसाळ्यात पूर येण्याची शक्यता असलेल्या 97 ठिकाणी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या असल्याची माहिती राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे महासंचालक पीयूष आनंद यांनी काल पुण्यात पत्रकारांशी बोलताना दिली. आपत्ती व्यवस्थापनाच्या कामात अत्याधुनिक उपकरणांचा उपयोग करण्याचा NDRF चा प्रयत्न असल्याचं ते म्हणाले.

**नद्यांना पूर**

राज्याच्या विविध भागात सध्या सुरू असलेल्या पावसामुळे धरणांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली असून काल गोसेखुर्द धरणाचे 9 दरवाजे उघडण्यात आले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे तेरेखोल, कर्लीसह काही नद्या दुथडी भरून वाहत आहेत. कर्ली नदी इशारा पातळीच्या वरून वाहत असल्याने नदीकाठच्या गावांना दक्षतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातल्या खेड तालुक्यातली जगबुडी आणि राजापूर तालुक्यातली कोदवली या दोन नद्यांनीही इशारा पातळी ओलांडली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात धरण क्षेत्रात अतिवृष्टी सुरू असल्याने नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. जिल्ह्यातले 52 बंधारे पाण्याखाली गेले आहेत. अहिल्यानगर जिल्ह्याच्या उत्तर भागात जोरदार पाऊस सुरू असून या आढळा प्रकल्प भरला आहे.

**क्रिकेट**

अँडरसन-तेंडुलकर चषकासाठी इंग्लंडमध्ये एजबस्टन इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल यानं द्विशतक झळकावून इतिहास रचला. इंग्लंडमधील कसोटी सामन्यात द्विशतक करणारा तो पहिला भारतीय तसंच पहिला आशियाई कर्णधार ठरला आहे. गिलनं केलेल्या दमदार 269 धावांमुळे भारताला 587 एवढी भक्कम धावसंख्या उभारता आली; त्यामुळे पहिल्या डावात संघाची स्थिती भक्कम झाली आहे. काल दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा यजमान इंग्लंडच्या संघाच्या तीन गडी बाद 77 या धावा झाल्या.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे; मराठवाड्यातही काही ठिकाणी पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.